विश्वविक्रमासह सांघिक सुवर्ण

नेमबाजीत भारताला तीन पदके; वैयक्तिक प्रकारात ऐश्वर्य तोमरला कांस्य

वृत्तसंस्था, हांगझो

'लोकसत्ता तरुण तेजांकित' पुरस्कार विजेता रुद्रांक्ष पाटील, दिव्यांश सिंह पन्वर आणि ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर यांच्या भारतीय संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारातील सांघिक विभागात विश्वविक्रमासह सुवर्णपदकाची कमाई केली. सोमवारी, स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी भारताला नेमबाजीत एकूण तीन पदके मिळाली. वैयक्तिक प्रकारात ऐश्वर्य तोमरने चुरशीच्या लढतीनंतर शूट-ऑफमध्ये कांस्यपदक मिळवले. पाठोपाठ पुरुषांच्याच २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकाराच्या सांघिक विभागात भारताने कांस्यपदक पटकावले.

यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकाचे खाते उघडून देताना ठाणेकर रुद्रांक्ष, दिव्यांश आणि ऐश्वर्य या त्रिकुटाने पात्रता फेरीत १८९३.७ गुणांसह चीन आणि दक्षिण कोरियाचे तगडे आव्हान परतवून लावले. रुद्रांक्षने यापूर्वी जागतिक स्पर्धेत सुवर्णपदकासह 'ऑलिम्पिक कोटा' मिळवला आहे.

वयाच्या १९व्या वर्षीच कमालीची प्रगल्भता दाखवणाऱ्या रुद्रांक्षने ६३२.५, ऐश्वर्य तोमरने ६३१.६, तर दिव्यांशने ६२९.६ गुणांची कमाई करताना एकत्रित जागतिक विक्रमाचाही वेध घेतला. कोरियाला (१८९०.१) रौप्य, तर चीनला (१८८८.२) कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

''स्पर्धा सोपी नव्हती. आमच्यासमोर आव्हान कठीण होते. सुवर्णपदक जिंकल्याचा आनंद आहेच, पण त्यापेक्षा चीनला हरवले याचा आनंद अधिक आहे,'' असे ऐश्वर्य तोमर म्हणाला.

सांघिक प्रकारात रुद्रांक्ष आणि दिव्यांशने अचूक वेध घेतला. वैयक्तिक प्रकारात दिव्यांश अपयशी ठरला. रुद्रांक्ष तिसऱ्या क्रमांकाने, तर ऐश्वर्य पाचव्या क्रमांकाने मुख्य फेरीत दाखल झाला. दिव्यांश आठवा आला. जागतिक अजिंक्यपद, विश्वचषक स्पर्धावगळून अन्य एखाद्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत एकाच वेळी तीन भारतीय प्रथमच अंतिम फेरीत खेळले.

मुख्य फेरीत संघ सहकारी रुद्रांक्षबरोबर झालेल्या तीव्र चढाओढीनंतर शूट-ऑफमध्ये ऐश्वर्यने २२८.८ गुणांसह कांस्यपदक आपल्या नावे केले. ऐश्वर्यला रौप्यपदकाची संधी होती. मात्र, कोरियाच्या पार्क हजूनने कामगिरी उंचावताना ऐश्वर्यला रौप्यपदकाच्या शर्यतीतून बाहेर काढले. चीनच्या शेंग लिहाओने २५३.३ गुणांसह जागतिक विक्रमाची नोंद करत सुवर्णपदकाची कमाई केली.

पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकाराच्या सांघिक विभागात अनिश भानवाला, विजयवीर सिद्धू आणि आदर्श सिंह या त्रिकुटाने कांस्यपदक मिळवले.



दिव्यांश सिंग पन्वर, ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर आणि रुद्रांक्ष पाटील



आदर्श सिंह, विजयवीर सिद्धू आणि अनिश भानवाला

> संघ म्हणून आम्ही सर्वोत्तम कामगिरी केली. सुवर्णपदक मिळवल्याचा आनंद झालाच. त्याच वेळी जागतिक विक्रम रचल्याचे समजले, तेव्हा आमचा आनंद द्वीगुणित झाला. देशाची मान उंचावण्यात आम्ही यशस्वी ठरलो, याचा अभिमान वाटतो. - रुद्रांक्ष पाटील

> माझ्या मुलाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सर्वोत्तम योगदान दिले. स्पर्धेला जातानाच देशासाठी सुवर्णपदक जिंकून येणार असे त्याने सांगितले होते. त्याने स्वतःवरील विश्वास सार्थ ठरवला याचा आनंद अधिक आहे. - बाळासाहेब पाटील, रुद्रांक्षचे वडील

बोपण्णा-भाम्ब्री जोडीला धक्का

टेनिस

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या टेनिस क्रीडा प्रकारातील पुरुष दुहेरीत सुवर्णपदकासाठी प्रमुख दावेदार मानल्या जाणाऱ्या रोहन बोपण्णा-युकी भाम्ब्री जोडीला पहिल्याच फेरीत पराभवाचा धक्का बसला. उझबेकिस्तानच्या सर्गे फोमिन-खुमोयुन सुल्तानोव जोडीने भारतीय जोडीला २-६, ६-२, १०-६ असे पराभूत केले.

भाम्ब्रीने सर्व्हिसमध्ये निराशा केली. त्याचे बरेचसे फटकेही स्वैर राहिले. बोपण्णाने सुरेख खेळ केला, पण त्याला युकीकडून पुरेशी साथ मिळू शकली नाही.

पुरुष दुहेरीतील या पराभवातून सावरत नंतर बोपण्णाने मिश्र दुहेरीत ऋतुजा भोसलेच्या साथीने उझबेकिस्तानच्या अकगुल अमामुराडोवा-मॅक्सिम शीम जोडीचा ६-४, ६-२ असा पराभव केला. या विजयासह बोपण्णा-ऋतुजा जोडीने उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

पुरुष दुहेरीत रामकुमार रामनाथन-साकेत मायनेनी जोडीने आगेकूच करताना इंडोनेशियाच्या सुसांतो इग्नाटियस ॲन्थनी-सुसांतो डेव्हिड अगुंग जोडीवर ६-३, ६-२ अशी मात केली. मिश्र दुहेरीत बोपण्णासह आगेकूच केल्यानंतर ऋतुजाने महिला दुहेरी आणि एकेरीतही चमक दाखवली. मिश्र दुहेरीत ऋतुजाने करमन कौर ठंडीच्या साथीने खेळताना कझाकस्तानच्या झनेल रुस्तेमोवा-अरुझन सागाण्डीकोवा जोडीचा ६-४, ६-२ असा पराभव केला.

वुशू : रोशिबिना देवीची पदकनिश्चिती

रोशिबिना देवीने वुशूमधील साण्डा या क्रीडा प्रकारात ६० किलो वजनी गटातून उपांत्य फेरी गाठताना भारताचे एक पदक निश्चित केले. उपांत्य फेरीत रोशिबिनाने कझाकस्तानच्या एमान करश्यागाचा पराभव केला. रोशिबिनाने ही लढत एकतर्फी जिंकली. याच वजनी गटात इंडोनेशियातील स्पर्धेतही रोशिबिनाने कांस्यपदक मिळवले होते. पुरुष विभागात याच वजनी गटात सूर्या भानू प्रताप सिंहने उपांत्यपूर्व फेरी गाठताना उझबेकिस्तानच्या इस्लोमबेक खायडारोवला २-१ असे नमवत उपांत्यपूर्व फेरी गाठली.



महिला क्रिकेट संघाचे ऐतिहासिक सोनेरी यश

युवा वेगवान गोलंदाज टिटास साधूच्या (६ धावांत ३ बळी) प्रभावी माऱ्याच्या बळावर भारतीय महिला क्रिकेट संघाने सोमवारी झालेल्या अंतिम सामन्यात श्रीलंकेवर १९ धावांनी विजय नोंदवत आशियाई क्रीडा स्पर्धेत प्रथमच सुवर्णपदक पटकावले. फलंदाजीसाठी आव्हानात्मक खेळपट्टीवर भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ बाद ११६ धावाच करता आल्या. मात्र, गोलंदाजांच्या अप्रतिम कामगिरीमुळे भारताने श्रीलंकेला ८ बाद ९७ धावांवर रोखत विजय साकारला. टिटासला डावखुरी फिरकी गोलंदाज राजेश्वरी गायकवाड (२/२०) आणि लेग-स्पिनर देविका वैद्य (१/१५) यांची चांगली साथ दिली. आशियाई स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या भारतीय महिला संघाला सुरुवातीपासूनच सुवर्णपदकासाठी प्रमुख दावेदार मानले जात होते आणि त्यांनी अपेक्षित यश संपादन केले. अंतिम सामन्यात भारतासाठी स्मृती मनधाना (४६) व जेमिमा रॉड्रिग्ज (४२) यांनी चांगली फलंदाजी केली.

सलग दुसऱ्या दिवशी रोइंगमध्ये यश

रोइंग क्रीडा प्रकारात भारतीय खेळाडूंनी कमालीची चिकाटी दाखवत आशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्या दिवशी देशाला दोन कांस्यपदके मिळवून दिली. भारताने एकूण पाच पदकांसह यंदाच्या आशियाई स्पर्धेत रोइंग क्रीडा प्रकाराची यशस्वी सांगता केली. इंडोनेशियात झालेल्या गेल्या स्पर्धेत भारताने रोइंगमध्ये तीन पदकांची कमाई केली होती. रोइंग प्रकारात भारताला सर्वसाधारण पाचवे स्थान मिळाले. चीनने ११ सुवर्ण आणि दोन रौप्य अशा एकूण १३ पदकांसह सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. सोमवारी भारताला प्रथम जसविंदर सिंग, भीम सिंग, पुनित कुमार आणि आशीष गोलियन यांनी पुरुषांच्या फोर्स प्रकारात कांस्यपदक मिळवून दिले. त्यानंतर स्कल्स ४ प्रकारात (क्वाड्रूपल स्कल्स) सतनाम सिंग, परमिंदर सिंग, जाकर कान आणि सुखमित सिंग यांनीही कांस्यपदक आपल्या नावे केले. भारतीय संघाने ६ मिनिटे ८.६१ सेकंद अशी वेळ दिली. उझबेकिस्तानने रौप्य, तर चीनने सुवर्णपदक मिळवले. भारतीय संघ २००० मीटरच्या शर्यतीत अखेरच्या ५०० मीटरपर्यंत चौथ्या स्थानावर होता. या अखेरच्या टप्प्यात भारतीय संघाने कमालीचे नियंत्रण दाखवताना तिसरा क्रमांक मिळवला. पुरुषांच्या फोर्स प्रकारातही भारतीय संघ अखेरच्या टप्प्यापर्यंत चौथ्या स्थानावर होता. अखेरीस भारतीय संघाने कमालीचा वेग पकडत ६ मिनिटे १०.८१ सेकंद अशी वेळ देत तिसरा क्रमांक पटकावला.

MCXCCL
मल्टी कमोडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय:- एक्स्चेंज स्क्वेअर, सीटीएस २५५, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
सीआयएन: यू७४९९९एमएच२००८पीएलसी१८५३४९; ई-मेल आयडी: ig-mcxccl@mcxccl.com; वेबसाइट : https://www.mcxccl.com

सूचना

याद्वारा सूचना देण्यात येते की, कंपनीची ज्यादा सर्वसाधारण सभा (''ईजीएम'') दिनांकित २३ सप्टेंबर २०२३ ''ईजीएम''च्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता, अल्पावधी सूचनेत व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/ अदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'')द्वारा शुक्रवार २९ सप्टेंबर २०२३ रोजी दु. ०४.३० वा. (भाप्रवे) घेण्यात येणार आहे. निगम कामकाज मंत्रालयाद्वारा निर्गमित केलेल्या सर्क्युलर्सच्या अनुसार ''ईजीएम'' ''व्हीसी''/''ओएव्हीएम''द्वारा घेण्यात येणार आहे. उक्त सर्क्युलर्सच्या अनुसार, ''ईजीएम''ची सूचना सर्व सदस्यांना कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या त्यांच्या ईमेल पत्त्यांवर २५ सप्टेंबर २०२३ रोजी इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठविण्यात आल्या आहेत. ''ईजीएम''ची सूचना https://www.mcxccl.com/disclosures/announcement या कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. ''ईजीएम''मध्ये उपस्थित राहण्याबाबत सूचनांची उक्त ''ईजीएम'' सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात आली आहे.
''ईजीएम''मध्ये विचारविनिमय करण्यात येणाऱ्या कामकाजाच्या आयटम्ससंबंधित कागदपत्रे सभेच्या तारखेपर्यंत पाहणीकरिता उपलब्ध असतील.

मंडळाच्या आदेशाद्वारा
मल्टी कमोडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
तारीख : २५ सप्टेंबर २०२३

50 YEARS OF TRUST
AYURVEDIC KAYAM TABLET
बद्धकोष्ठतेस कायम ठेवते दूररररर...
कायम टॅब्लेट
बद्धकोष्ठता आणि त्याच्याशी संबंधित सर्व समस्या जसे की ॲसिडिटी, गॅस, अपचन, डोकेदुखी, तोंडात व्रण, करपट ढेकर येणे, भूक न लागणे, पोट आणि छातीत जळजळ, स्फूर्तीची कमतरता, त्वचेची वेदना इत्यादीपासून आराम देते. कायम टॅब्लेटची रात्री घ्या फक्त एक गोळी आणि सकाळी तुम्हाला मिळेल बद्धकोष्ठतेपासून मुक्ती! आयुर्वेदिक औषधी आणि जडीबुटींपासून बनवलेल्या कायम टॅब्लेट पूर्णपणे नैसर्गिक आणि निर्धोक आहेत. मग आता स्फूर्ती-तंदुरुस्तीला करा जवळ आणि बद्धकोष्ठतेला ठेवा दूर...
कायम चूर्णसुद्धा उपलब्ध
कायम चूर्ण 50, 100 आणि 200 ग्रॅममध्ये उपलब्ध
भावनगरवाले शेठ ब्रदर्स यांचे आयुर्वेदिक उत्पादन
Toll Free No.: 1800 419 0807 (11 to 6 Mon to Sat) | E-Mail : contact@kayamchurna.com | Buy online amazon | 1mg

संक्षिप्त

पाकिस्तानच्या खेळाडूंना 'व्हिसा' मंजूर

इंदूर : आगामी एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या खेळाडूंना भारताचा 'व्हिसा' मंजूर करण्यात आला आहे. याबाबतची माहिती आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) सोमवारी देण्यात आली. पाकिस्तानचे खेळाडू आणि पदाधिकाऱ्यांना भारताचा 'व्हिसा' मिळवण्यात होणाऱ्या विलंबाबाबत पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) 'आयसीसी'कडे चिंता व्यक्त केली होती. पाकिस्तानचा संघ २७ सप्टेंबर रोजी भारतात येणे अपेक्षित असून त्याच्या केवळ ४८ तासांआधी त्यांना 'व्हिसा' मंजूर करण्यात आला. ५ ऑक्टोबरला विश्वचषकाला सुरुवात होणार असून त्यापूर्वी पाकिस्तानचा संघ हैदराबाद येथे न्यूझीलंड (२९ सप्टेंबर) आणि ऑस्ट्रेलिया (३ ऑक्टोबर) यांच्याविरुद्ध सराव सामने खेळणार आहे.

दालमिया, धुमल 'आयपीएल' प्रशासकीय समितीत कायम

नवी दिल्ली : बंगाल क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अविषेक दालमिया आणि इंडियन प्रीमियर लीगचे (आयपीएल) अध्यक्ष अरुण सिंह धुमल यांची सोमवारी गोवा येथे झालेल्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वार्षिक सर्वसाधारण सभेत 'आयपीएल' प्रशासकीय समितीत फेरनिवड झाली. 'आयसीसी'च्या वार्षिक उत्पन्नातील ३८ टक्क्यांहून अधिक वाटा आणि पुढील पाच वर्षांसाठी द्विपक्षीय मालिकांच्या माध्यमातून सामन्यामागे जवळपास ६७ कोटी रुपये, याबाबत 'बीसीसीआय'कडून माहिती देण्यात आली. भारताचा माजी फिरकीपटू प्रग्यान ओझा आता कार्यकारी परिषदेत भारतीय क्रिकेटपटूंच्या संघटनेचा प्रतिनिधी नसेल.

नोव्हेंबर महिन्यात 'महाराष्ट्र केसरी'ची दोन मैदाने!

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार प्रणित महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेपाठोपाठ विदर्भाचे खासदार रामदास तडस प्रणित महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघानेही राज्य अजिंक्यपद, तसेच महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची घोषणा केली. दोन्ही स्पर्धा नोव्हेंबरमध्येच होणार आहेत. यामुळे आता अधिकृत कोणती आणि अनधिकृत कोणती, या संघटनात्मक चढाओढीत राज्यातील कुस्तीगिरांची मात्र फरफट होत आहे. कुठल्या स्पर्धेत खेळायचे या संभ्रमावस्थेत सध्या राज्यातील मल्ल आहेत.

MARUTI SUZUKI COMMERCIAL
MAHANAGAR GAS
NEW SUPER CARRY S-CNG
महानगर गॅस लि. कडून ₹ 19 999* चे प्रिपेड CNG गिफ्ट कार्ड मिळवा#
#310 + MGL CNG स्टेशन्सवर संपूर्ण मुंबई, ठाणे आणि रायगडमध्ये रिफ्युएल करा.
CNG + PETROL
CNG + 5L आपत्कालीन पेट्रोल टाकी
☑ मायलेज ☑ ताकद ☑ नफा
NEW SUPER CARRY
WWW.MARUTISUZUKICOMMERCIAL.COM | अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांकावर फोन करा 1800 102 1800/1900 1800 150
EXCLUSIVE MARUTI COMMERCIAL SHOWROOMS: MUMBAI: AHER AUTO PRIME LLP, DOMBIVLI: 9967080334; AUTOMOTIVE MANUFACTURERS PVT. LTD., APMC MARKET, VASHI: 9930832310; EXCELL AUTOVISTA, KONGAON: 9082362358. FORTPOINT AUTOMOTIVE PVT. LTD., BHIWANDI: 40791111, 9594974633 LALBAUG: 9594974633; PRAKASH AUTO PVT. LTD., ULHASNAGAR: 9322925800; SAI SERVICE PVT. LTD., VASAI: 8291981905, 9594952104; SHIVAM AUTOZONE, ANDHERI: 8082585555 BOISAR: 9870931111 CHEMBUR: 7777049199; SIMRAN MOTORS PVT. LTD., TAKKA: 8691043034, 9223161400; VELOX MOTORS, THANE: 9867567607, 9111949494.

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर* (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.

epaper.loksatta.com